**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

**-------------------------**

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ / फाल्गुन २६, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **कामगार मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री ,महिला व बालविकास मंत्री** | |

**------------------------------------**

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

**------------------------------------**

**मुंबईतील सर जे.जे .रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी यांनी बेकायदा बँकेत खाते उघडल्याबाबत**

**(१) * ६१४७७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालय ग्रांट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ऑर्थो, सर्जिकल, ॲनाटॉमी विभागातील विभागप्रमुखांनी तसेच त्यांच्या सहयोगी डॉक्टरांनी शासनाची परवानगी न घेता शस्त्रक्रिया साहित्य, फार्मा कंपन्यांबरोबर आर्थिक संगनमत करुन त्याद्वारे प्राप्त झालेले कमिशन निधी तसेच खाजगी प्रॅक्टीसमधून मिळणारा निधी एसबीआय, सिंडिकेट (JJ Orthopedic CME A/C – ५०२९२०१०१२५९७८, IFC Code SYNB०००५०२९) आदि विविध बँकेत रुग्णालयीन विभागाच्या नावाने बेकायदेशीररित्या सीएमई खाते उघडून त्याद्वारे कोटयावधी रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार अद्यापही करण्यात येत असल्याची तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.मयुर साळवी यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना लेखी स्वरुपात सादर करुनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी बँक खात्यामधील जमा रक्कमेची नोंद व ऑडीटबाबत शासनास कोणतीही माहिती न देता आयकर वाचविण्याच्या दृष्टीने सदरहू रुग्णालयातील विभागप्रमुख डॉक्टरांनी बँकेत खाती सुरु केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या दिनांक १३ ऑगस्ट,२०२१ रोजीच्या पत्रकानुसार राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत असलेले रुग्णालय विभागाची सर्व खाती बंद करण्याचे आदेश देणे, त्याचबरोबर महात्मा ज्योतीबा फुले जन योजना कार्यालय, जे.जे.

रुग्णालयामधील सर्व अधिकाऱ्यांचे बदली करण्याचे आदेश सदरहू परिपत्रकाद्वारे देण्यात येऊनही अद्याप त्यांची बदली करणेबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली तसेच महात्मा ज्योतीबा फुले जनयोजना कार्यालयातील अधिकाऱ्यांची अद्याप बदली न करण्याचे कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अधिष्ठाता, सर ज.जी समुह रुग्णालय, मुंबई यांच्या आदेशान्वये महात्मा जोतीबा फुले जनआरोग्य योजना येथील कर्मचाऱ्यांच्या बदली करण्यात आलेल्या आहेत.

(४ प्रस्तुत प्रकरणी केलेल्या चौकशीत सर ज.जी समुह रुग्णालयातील ११ विभागाच्या प्रमुखांनी विभागाच्या नावाने बँकांमध्ये स्वतंत्र खाते उघडल्याचे निदर्शनास आले असून याबाबत विभागप्रमुखांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील अटींची पूर्तता न करणाऱ्या खाजगी रुग्णालयावर कारवाई करणेबाबत**

**(२) * ६१६७५ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खाजगी रुग्णालयांची तपासणी 'रुग्ण हक्क मोहीम' व 'साथी' यांच्यावतीने माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२२ या यादरम्यान केली असता शहरातील ४० पैकी केवळ ३ खासगी रुग्णालयांनी अटींची पुर्तता केल्याचे निदर्शनास आले असून अन्य खाजगी रुग्णालयात महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अधिनियमानुसार कोणत्याही अटींची पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक खाजगी रुग्णालयांनी रुग्णांचे हक्क सांगणारी 'रुग्ण हक्क सनद' व त्यांच्याकडील उपचारांचे 'दरपत्रक' आणि रुग्णांसाठी तक्रार निवारण कक्षाची माहिती दर्शनी भागात प्रदर्शित करणे कायद्याने बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, बॉम्बे नर्सिंग होम अधिनियमातंर्गत पुणे महापालिकाहद्दित ५० हून अधिक खाजगी रुग्णालयांनी परवान्याचे नुतनीकरण केले नसल्याचे निदर्शनास आले असून ही रुग्णालये बंद आहेत किंवा इतरत्र स्थलांतरीत केली आहेत याबाबतीत काही माहिती नसल्याचे दिनांक १६ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अटींची पूर्तता न करणा-या खाजगी रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र शुश्रूषा नोंदणी नियम, २०२१ नुसार त्रयस्थ संस्थेकडून तपासणीबाबत तरतूद नाही. तथापि, पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून खाजगी शुश्रूषागृहांची वर्षातून दोनदा तपासणी केली जाते.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

तपासणीअंती एकूण ५६ रुग्णालयांनी नर्सिंग होम परवाना नुतनीकरण केले नव्हते. या ५६ रुग्णालयांना परवाना नुतनीकरण करुन घेणेबाबत नोटीस देण्यात आल्या होत्या. याबाबत क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी यांनी पाहणी करुन तपासणी अंती ४० रुग्णालये व्यवसाय बंद असल्याचे आढळून आले आहे. तसेच ७ रुग्णालयाची प्रकरणे नुतनीकरणसाठी दाखल होऊन नुतनीकरण करून देण्यात आले आहे. उर्वरित ९ रुग्णालयांचे नुतनीकरण करून घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून मुंबई नर्सिंग होम अॅक्ट नुसार वेळोवेळी नुतनीकरण न केलेल्या रुग्णालयांवर प्रशासकिय कारवाई करण्यात येत असते व नोटीसा देऊन नुतनीकरण करुन घेणे बाबत आदेश देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरोग्य विभागातील आशा सेविका, गटप्रवर्तक व बीसीएम यांच्या विविध मागण्यांसंदर्भात**

**(३) * ५९९५५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माता मृत्यूचे प्रमाण रोखणे, बालकांचे लसीकरण तसेच संसर्गजन्य व असाध्य आजारांच्या साथ रोगाच्या वेळी घरोघरी जाऊन आरोग्य सेवा पुरवणाऱ्या आशा सेविका व गटप्रवर्तक यांना अपुरे मानधन मिळत असून त्यांना सोयी- सुविधा दिल्या जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागातील शहरी व ग्रामीण भागातील आशासेविका व गटप्रवर्तक तसेच बीसीएम यांनी आपल्या मागण्यांसाठी विविध संघटनांद्वारे नागपूर येथे दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास बेमुदत धरणे व आंदोलन मोर्चा काढून संघटनेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन शासनास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामध्ये शहरी व ग्रामीण आशासेविकांना ठोक १८ हजार रुपये, गटप्रवर्तकांना २५ हजार रुपये व बीसीएमला ३० हजार रुपये मानधन देऊन त्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करून कायमस्वरूपी करण्यात यावे, दिवाळी बोनस ५००० देण्यात यावा, तीन ते चार महिन्याचे वाढीव थकित मानधन त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे परिपत्रक काढण्यात यावे, सेस फंडातून दरमहा १००० रुपये, वैद्यकीय व प्रसूती रजेचे पैसे, आरोग्यवर्धनीचे १००० रुपये लागू करावे, पी एच सी वर एक रूम, टेबल, खुर्ची, कपाट, संगणक देण्याची व्यवस्था करावी, ज्या आशासेविकांनी नर्सिंग कोर्स केले त्यांना कुठल्याही अटी शर्ती न ठेवता आरोग्य सेविका म्हणून नेमणूक करावी, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचे कोणतेही काम गटप्रवर्तकांना देऊ नये, रिक्त पदांची भरती करणे अशा अनेक मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आशा व गटप्रवर्तकांची नियुक्ती कामावर आधारीत मोबदला या तत्वावर करण्यात येत असल्यामुळे त्यांना किमान वेतन व नियमित करण्याबाबतचे कोणतेही धोरण अस्तित्वात नाही. केंद्रशासनाकडुन आशा व गटप्रवर्तकांना दिवाळी बोनस देण्याबाबत कोणत्याही सुचना प्राप्त नाही. तसेच आशा व गटप्रवर्तकांना नियमितपणे मानधन अदा करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्याचा पाणी टंचाई आराखडा तयार न झाल्याबाबत

**(४) * ६१६५९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील १०० हून अधिक गावांसह १५० वाडयांना दरवर्षी उन्हाळयामध्ये टँकरव्दारे पाणीपुरवठा करावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणीटंचाईला सामोरे जाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपायोजनांचा संभाव्य आराखडा माहे फेब्रुवारी,२०२३ सुरु होऊनही अद्याप तयार करण्यात आला नसल्यामुळे आराखडा कधी मंजूर होणार व त्यानुसार उपाययोजनांचे नियोजन कसे होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त वाड्यांना ऊन्हाळ्यात नियमित पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही/आराखडा तयार करणेबाबत तसेच संबंधित प्रकरणी दिरंगाई करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे
(२) व (३) हे खरे नाही,
मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार केला असून सदर आराखडा मंजूरीसाठी विभागीय आयुक्त कोकण यांना जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्याकडून सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही

-----------------

## सिन्नर (जि. नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयातील औषधसाठा व वैद्यकीय साहित्य यांची खासगी डॉक्टरांना विक्री झाल्याबाबत

**(५) * ६२८२५ श्री.दिलीपराव बनकर (निफाड), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि. नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रु.२३ लाख ६४ हजार किंमतीच्या वैद्यकीय साहित्याची चोरी झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील औषधसाठा व वैद्यकीय साहित्य हे शहरातील खाजगी डॉक्टरांना विकले असल्याचे तपासात उघडकीस आले असून या प्रकरणात रुग्णालयातील कर्मचा-यांचा समावेश असल्याचा संशय आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सिन्नर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन यास जबाबदार असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) (२) व (३) होय
(४) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक, यांनी ४ सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली. सदर चौकशी समितीने चौकशी करुन अहवाल जिल्हा शल्य चिकित्सक यांना सादर केला आहे.
सदर अहवालामध्ये दोषी कंत्राटी कर्मचारी श्री. अनिल कासार यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची शिफारस करण्यात आली होती, त्यानुसार याप्रकरणी वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय सिन्नर यांनी दि. २५.०१.२०२३ रोजी सिन्नर शहर पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीस अटक करुन न्यायालयासमोर नेले असता आरोपीस पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. याबाबत पुढील तपास सुरु आहे.

सदर चौकशी अधिकाऱ्याने ग्रामीण रुग्णालय सिन्नर येथे भांडार पडताळणी पथकामार्फत सविस्तर लेखा परिक्षण करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच समितीच्या शिफारशीनुसार दोषी कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) तालुक्यामधील स्व. सौ. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्यासह श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(६) * ६२४९६ श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) तालुक्यामधील स्व. सौ. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात इतर तालुक्यातील विशेषत: पाटण, इस्लामपूर, कडेगाव भागातील रुग्ण उपचाराकरीता येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या जवळ असलेल्या या रुग्णालयात सध्या १०० खाटांची व्यवस्था असून २०० खाटांचे रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिट सुरु करणेचा प्रस्ताव सन २०१८ मध्ये सादर केला असुन तो अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय, कराड येथे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्यासह २०० खाटांचे रुग्णालय करण्याबाबत व रुग्णालयातील रिक्त पदे त्वरित भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.
(२) व (३) ट्रामा केअर युनिट व उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव नव्याने मागवून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात स्कीन बँक सुरु करणे तसेच सीटी स्कॅन मशीन उपलब्ध करणेबाबत**

**(७) * ६१९८८ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयात गंभीर स्वरुपाच्या जळित रुग्णांवर त्वचा प्रत्यारोपणाने (होमोग्राफ्टिंग) जीव वाचविता यावा यासाठी नागपूर येथिल वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात माहे जून,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान "स्किन बँक" स्थापन केली आहे तथापि सदरील बँक चालविण्यासाठी स्किन फ्रीजरसाठी लागणाऱ्या विविध रसायन, ग्लोव्हज तसेच इतर साहित्य व मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने अद्यापही ही बँक विनावापर असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीनच्या कमतरतेमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयात स्कीन बँक कार्यान्वित करण्यासाठी उद्भवण्या-या समस्यांचे निराकरण करणे तसेच सीटी स्कॅन मशीन उपलब्ध करणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) जळीत रुग्णांवर त्वचा (होमोग्राफ) प्रत्यारोपण ही प्रक्रिया जुनी झालेली असून आता नवीन बायोलॉजीकल ड्रेसिंग वापरुन रुग्णावर उपचार करण्यात येत असल्याने संस्थेत स्किन बँकेची गरज नसल्याने सुरु करण्यात आलेली नाही.
(२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर, ट्रॉमा केअर सेंटर, नागपूर व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर या तिन्ही रुग्णालयांत प्रत्येकी एक सी.टी. स्कॅन मशीन सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील युवकांना नोकऱ्या व रोजगार मिळावा म्हणून कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रभावी योजना राबविण्याबाबत**

**(८) * ६३०७० श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील युवकांना नोकऱ्या व रोजगार मिळावा म्हणून कौशल्य विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याबाबत विभागाच्या परफॉर्मस बजेट अहवालातून माहे जानेवारी. २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौशल्य रोजगार, उद्योजकता विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या ५६ लाख ४० हजार तरुणांपैकी केवळ ३.८८ % तरुणांना नोकऱ्या देण्यात विभागाला यश आले असून त्यांच्या प्रशिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या ४ प्रमुख योजनांचा सुमारे ५४ कोटींचा निधी शिल्लक राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कौशल्य विकास योजना राबविण्यासाठी विभागाने सन २०२१-२२ मधील निधी असूनही योजना का राबविल्या नाहीत याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुषंगाने उक्त योजना प्रभावीपणे न राबविणाऱ्या संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

विभागाच्या महास्वयंम या वेबपोर्टलवर रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राची सुरुवात झाल्यापासून म्हणजेच १९७८ पासून ते डिसेंबर, २०२१ पर्यन्त ५६ लाख ४० हजार युवक युवतींची नोंदणी क्रमवर्धित पध्दतीने झालेली आहे. महास्वयंम पोर्टलवर शासनातर्फे इच्छूक बेरोजगार उमेदवारांना व आस्थापनांना नोंदणी करण्याकरीता ऑनलाईन प्लॅटफार्मची सोय आहे व ती ऐच्छीक आहे. सदर संख्याची माहिती ४५ वर्षापासूनची आहे.

वरील डाटापैकी सन फेब्रुवारी, २०२३ अखेर आधार संलग्न नोंदणी असलेल्या उमेदवारांची संख्या २५.८६ लक्ष इतकी आहे. जानेवारी २०२१ ते डिसेंबर, २०२१ या दरम्यान नोंदणीकृत ४,९३,५१३ उमेदवारांपैकी नोकरी उपलब्ध झालेल्या उमेदवारांची संख्या २,१९,१५६ अशी असून ती ४४.४० % इतकी आहे.

राज्यात विविध विभागामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. उदा. कृषि, उद्योग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बाल कल्याण, रोहयो इ. कौशल्य विकास विभागामार्फत डिसेंबर, २०२२ पर्यन्त ५,२७,००० उमेदवारांना कौशल्य वाढीकरीता प्रशिक्षण देण्यात आलेले आहे . त्यापैकी २,६५,००० उमेदवारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्यानुसार सरासरी ५० टक्के इतका रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

कोविड साथीच्या प्रादुर्भावामुळे वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २४.०६.२०२१ व दिनांक १४.१०.२०२१ अन्वये महसुल खर्चात बचत करण्याच्या अनुषंगाने वित्तीय निर्बंध घातलेले होते तसेच कोविडमुळे प्रशिक्षण केंद्रे ही बंद ठेवण्यात आली होती. त्यानुसार सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान अंतर्गत वितरीत निधी खर्च करण्यावर मर्यादा आल्या होत्या. याच बरोबर अल्प मुदतीच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाचे पुर्ण चक्र १२ ते १८ महिन्यांचे (रोजगार /स्वयंरोजगारासहीत) असते. त्यामुळे निधी एका वर्षात खर्च होत नाही. त्यामुळे प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, प्रधानमंत्री कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना २.०, ३.० व कृषी आरपीएल अशा चार योजनांचा रु. ५४ कोटी निधी मार्च २०२२ अखेर शिल्लक असल्याचे दिसून येते.

"संकल्प" या योजनेअंतर्गत कारागृहे , दिव्यांग, तृतीयपंथी, महिला सेक्स वर्कर यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले आहेत.

याशिवाय बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने सन २०२२-२३ या वर्षात जानेवारी २०२३ अखेरपर्यन्त ४५७ मेळावे आयोजित करण्यात आले. या माध्यमातुन ४८,६४१ उमेदवारांची नोकरीसाठी निवड झाली असून त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सेंटर फॉर मॉनिटरींग इंडीयन इकॉनॉमिच्या अहवालानुसार फेब्रुवारी २०२३ चा भारताचा बेरोजगार दर ७.४५ तर महाराष्ट्राचा ५.६ असा आहे. सदर बेरोजगाराचा दर इतर राज्यापेक्षा कमी आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा

**(९) * ६१९९४ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून रुग्णांना बाहेरुन स्वखर्चाने औषधे खरेदी करावी लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्च,२०२२ नंतर निधी असून देखील शासन स्तरावरुन तांत्रिक मान्यता मिळू न शकल्याने औषध खरेदी होऊ शकलेली नाही तसेच हाफकिन संस्थेकडून औषध पुरवठा न झाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रावर औषध तुटवडा निर्माण झाल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन महिन्यापूर्वी शासनाकडून तांत्रिक मान्यता मिळूनही अंदाजे साडेपाच कोटी रुपयांची औषध खरेदी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नंदुरबार जिल्हा रुग्णालय व जिल्ह्यातील ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालयामध्ये सद्यस्थितीत: पुरेसा औषध साठा उपलब्ध आहे. उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक यांचेकडून जुलै २०२२ मध्ये रु. ४,९१,१२,३८७/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नंदुरबार यांचेकडून प्रशासकीय मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबवून माहे डिसेंबर २०२२ दरम्यान पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. औषधी, साहित्य हे वेळेत उपलब्ध झाले आहेत. हाफकिन संस्थेकडून काही प्रमाणात औषधी, साहित्य उपलब्ध झाल्याने, सदर औषधी साहित्याचे ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये याठिकाणी वितरीत करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी औषध,साहित्याचा तुटवडा निर्माण झालेला नाही. मार्च २०२२ मध्ये जिल्हास्तरावर खरेदी करण्यात आलेली औषधे, राज्यस्तरावरुन प्राप्त झालेली औषधे यांचा वापर करण्यात येत आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर अत्यावश्यक प्रसंगी रुग्ण कल्याण समितीच्या निधीतुन व मानव विकास शिबीर निधीतुन खरेदी करण्यात आलेली औषधे यांचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यात 'बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजने" ची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१०) * ६२३९३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजने" अंतर्गत रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास अपघातग्रस्त रुग्णाची परिस्थिती स्थिर करण्यासाठी पहिल्या ७२ तासासाठी नजिकच्या अंगीकृत शासकीय किंवा खाजगी रुग्णालयामधुन ७४ उपचार पध्दतीच्या माध्यमातून उपचार देण्यात येणार असून त्यासाठी ३० हजार रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्याचे निश्चित केले असतानाही या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत योजनेची अंमलबजावणी न होण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी प्रत्यक्षात कधीपर्यत सुरु करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार सदर योजना विमा कंपनी मार्फत राबविण्याबाबत मंजुरी देण्यात आली होती. तथापि ही योजना हमी तत्वावर राबविल्यास शासकीय निधीची बचत होईल हे लक्षात घेऊन अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील विमा कंपनी निवड समितीच्या दिनांक १२ मार्च, २०२१ च्या बैठकीमध्ये योजना हमी तत्वावर राबवण्याची शिफारस करण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध व्यापक सुधारणा मुख्य कार्यकारी अधिकारी,राज्य आरोग्य हमी सोसायटी यांनी प्रस्तावीत केल्या आहेत. स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबविण्याबाबत दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या अपघाता संदर्भातच्या सर्व उपचारांचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्येच करण्याचे प्रस्तावीत आहे.

-----------------

**राज्यातील रुग्णालयात नियमित औषध पुरवठा करणेबाबत**

**(११) * ५७१८० श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण),**

**श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्दी, ताप, खोकला, धनुर्वात यासारख्या अनेक आजारांवरील औषधांचा तुटवडा असल्याने याबाबत तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी कमी अधिक प्रमाणात सदर केंद्रात औषधांचा तुटवडा असल्याबाबतचे नमूद करून अधिक औषध पुरवठा व्हावा यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे पाठपुरावा करत असल्याचे म्हटले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, घूलेवाडी (ता.संगमनेर,जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयात बिबटयाच्या हल्ल्यात जखमी मुलाला तेथे औषधे उपलब्ध नसल्याने उपचारासठी खासगी रुग्णालयात दाखल करावे लागले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सातारा येथील जिल्हा रुग्णालयात सहा महिन्यांपासून औषधाचा पुरवठा नसल्यामुळे सहा जिल्ह्यांतील थॅलेसिमिया आजाराने ग्रासलेल्या रुग्णांची गैरसोय होत असून रुग्णांना बाहेरुन स्वखर्चाने औषधे खरेदी करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णालयांमध्ये नियमित औषध पूरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) जानेवारी २०२३ मध्ये पंढरपुर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, भाळवणी येथे सर्दी, ताप व खोकला इ. बाबतचे रुग्ण आढळुन आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्र, भाळवणी येथे रुग्णांना नियमितपणे तपासणी करुन, औषधे पुरवठा करण्यात येत होता. जिल्हास्तरावरुन सर्व औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर उपलब्ध ठेवावा तसेच काही औषधे कमी पडत असतील तर स्थानिक स्तरावर आवश्यक ती औषधे उपलब्ध करुन घ्यावीत असे तालुका आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकारी यांना कळविलेले आहे.जिल्हास्तरावरुन पंढरपुर तालुक्यातील अधिनस्त सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना ताप, सर्दी व खोकला करीता औषधांचा पुरवठा केलेला आहे.

राज्यस्तरावरुन प्राप्त झालेल्या औषध साठ्यानुसार तालुका स्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर तात्काळ औषधपुरवठा करण्यात येत असुन जिल्हास्तरावर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवताप या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(१२) * ६१५३४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गडचिरोली जिल्हयात दिनांक १ जानेवारी ते ३१ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत सुमारे ७ हजार ८४१ हिवतापग्रस्त रुग्ण आढळून आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिवतापामुळे मृतांच्या संख्येत देखील वाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिवताप या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यात माहे १ जानेवारी ते ३१ ऑक्टोबर,२०२२ या कालावधीत ७९१४ इतके हिवतापग्रस्त रुग्ण आढळून आलेले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे .

सन २०२१ व २०२२ मधील माहे ऑक्टोबर मधील माहिती खालीलप्रमाणे-

| सन | हिवताप रुग्ण संख्या | मृत्यू |
|---|---|---|
| ३१ ऑक्टोबर २०२१ | ९०६९ | ७ |
| ३१ ऑक्टोबर २०२२ | ७९१४ | १३ |

सन २०२२ मध्ये हिवताप रुग्ण संख्या सन २०२१ च्या तुलनेत रुग्णांमध्ये घट झालेली दिसून येते. तथापि मृत्यू अनुक्रमे ७ व १३ झालेली आहेत.

(३) सहसंचालक (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) यांचे कार्यालयामार्फत हिवतापाचे पर्यवेक्षण दरवर्षी माहे डिसेंबर ते जानेवारी या कालावधीत केले जाते.

**हिवताप नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने केलेल्या उपायोजना खालीलप्रमाणे** :-

• प्रत्यक्ष ताप रुग्ण सर्वेक्षण-

सन २०२१ मध्ये गडचिरोली जिल्हयात ८९७०११ रक्तनमुने तपासणी करण्यात आली त्यापैकी १२३२६ रक्तनमुने दुषित आढळून आले.

सन २०२२ मध्ये गडचिरोली जिल्हयात १२०४६५९ रक्तनमुने तपासणी करण्यात आली तसेच गडचिरोली जिल्हयात घेण्यात आलेल्या विशेष माहिमेत ४७७०९३ रक्तनमुने तपासणी करण्यात आली. दोन्ही रक्तनमुने तपासणी मोहिमेत ९२०५ रक्तनमुने दुषित आढळून आले.

सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये हिवताप रुग्णसंख्या कमी झाल्याचे दिसून येते.

• तपासणी- संकलित केले सर्व रक्त नमुने प्रयोगशाळेत मोफत तपासणी करून हिवताप दुषित रुग्णांना मोफत औषधोपचार देण्यात आलेले आहेत.

• किटकशास्त्रीय सर्वेक्षण- यामध्ये आरोग्य सेवक, सेविका, आशा यांचे मार्फत घरोघरी डास अळी सर्वेक्षण करून दुषित कंटेनर रिकामे केले जातात व जे कंटेनर रिकामे करु शकत नाहीत अशा कंटेनरमध्ये  मध्ये टेमीफॉस या अळीनाशकाचा वापर केला जातो.

• घरोघरी किटकनाशक फवारणी- वार्षिक जंतू दर २ पेक्षा अधिक असलेल्या गावामध्ये घरोघरी किटकनाशक फवारणी केली जाते. सन २०२१ मध्ये एकूण ९३४ गावांमधील ८१०८२ घरामध्ये किटकनाशक फवारणी करून ३५७४११ इतक्या लोकसंख्येस १०० टक्के संरक्षण दिले. त्याप्रमाणे सन २०२२ मध्ये एकूण ६५४ गावामधील ४८९२९ घरामध्ये किटनाशक फवारणी करून २३९२३४ इतक्या ९७ टक्के लोकसंख्येस संरक्षण दिले.

• दिर्घकालीन किटकनाशक भारीत मच्छरदाणी- सन २०२१ मध्ये हिवताप नियंत्रणासाठी शासनाने वार्षिक जंतू दर १ पेक्षा अधिक असलेल्या हिवतापग्रस्त गावामध्ये घरोघरी एकूण १९८०० इतक्या किटकनाशक भारीत मच्छरदाणीचे वाटप केलेले आहे.

• दर आठवडा हिवताप रुग्णामध्ये वाढ झाली किंवा घट झाली याबाबत प्रा.आ.केंद्र, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तरावर अन्वेषण केले जाते.

• जनजागृती :-

अ) शालेय हिवताप जागृती मोहिम- शाळेतील मुलांना डास अळया ओळखण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. दरवर्षी जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल या दिवशी व संपूर्ण जून महिना हा पारेषण काळ म्हणून घोषित केला जातो. या महिन्यात दर दिवशी १ कार्यक्रम राबविला जातो व जिल्हयात प्रभात फेरी काढून किटकजन्य आजाराचे जन जागृती केली जाते.

ब) हिवताप पारेषण कालावधीमध्ये डासोत्पत्ती स्थानामध्ये झालेली वाढ आरोग्य कर्मचारी, ग्रामपंचायत व लोक सहभागातून नियंत्रित केली जाते.

क) आरोग्य शिक्षणासाठी भिंती पत्रके, हस्त पत्रिका, घंटा गाडी, दुरदर्शन, रेडियो, मायकिंग इ. माध्यमातून हिवताप जन जागृती केली जाते.

ड) गणेश उत्सव,दुर्गा पुजा उत्सव यावेळी हिवताप आजाराविषयक प्रदर्शक लावून जनमानसात किटकजन्य आजाराबाबत जनजागृती राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा परिषदेला विकासकामासाठी दिलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१३) * ६३३४७ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अमरावती जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा परिषदेला कोटयावधी रुपयांचा विकास कामासाठी मंजूर केलेला निधी आर्थिक वर्षातील काही कालावधी शिल्लक असताना मोठया प्रमाणात निधी अखर्चित राहिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी अखर्चित राहिल्यास संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरुन त्याच्यावर कारवाई करण्याच्या स्पष्ट लेखी सूचना संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ) यांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर विकास कामावरील निधी अखर्चित न राहता विकास कामावर खर्च करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विकास कामांवर खर्च करण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावर आढ़ावा घेऊन शिल्लक निधि दिनांक ३१ मार्च,२०२३ पर्यंत खर्च करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सर्व विभागप्रमुखाना अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील एकाच कामाचे करारनामे दोन एजन्सीचा नावाने करण्यात आल्याबाबत

**(१४) * ६१३८३ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आगडी येथे २५१५ जिल्हा निधी अंतर्गत सिमेंट क्रॉंक्रिट रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत सोबत दिनांक २५ फेब्रुवारी,२०२२ रोजी करारनामा केला असतानाही त्याच कामाचे जानाळा ग्रामपंचायतने एका कंत्राटदाराच्या नावाने दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी करारनामा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमाचे उल्लंघन करुन करारनामा करणाऱ्या कंत्राटदार व दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही, हे खरे नाही. राज्य गुणवत्ता नियंत्रक यांनी झालेल्या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून बांधकामाच्या दर्जाबाबत तपासणी करुन सदर काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

(२) व (३) होय, सदर कामाचे कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दि. २५.०२.२०२२ अन्वये ग्रामपंचायत, जानाळा यांना कार्यारंभ आदेश दिला. मात्र सदर काम ग्रामपंचायत, जानाळा कंत्राटदाराच्या मार्फत करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याप्रकरणी, सरपंच व सचिव, ग्रामपंचायत जानाळा यांचेकडून खुलासा मागविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे नानक कंन्स्ट्रक्शन (ता.काटोल जि.नागपूर ) या संस्थेचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत

**(१५) * ६२८८० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. नानक कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) (ता.काटोल जि.नागपूर) या संस्थेच्या विरोधात जलसंधारण विभाग जिल्हा परिषद नागपूर, बांधकाम विभाग जिल्हा परिषद नागपूर, लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद नागपूर या विभागातील अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर आर्थिक गुन्हे शाखा नागपूर शहर यांनी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले असल्यामूळे या संस्थेला काळया यादीत टाकण्यात यावे असा प्रस्ताव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी कक्ष अधिकारी (बांध-२) ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई यांना दिनाक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. नानक कन्स्ट्रक्शन या संस्थेच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असतांना आणि त्याप्रमाणे या संस्थेस काळया यादीत टाकण्याचा रितसर व स्वयंस्पष्ट अहवाल ग्रामविकास विभागाकडे पाठविण्यात आले असतांना सुध्दा अद्यापही सदर संस्थेला काळया यादीत टाकण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मे. नानक कन्स्ट्रक्शन या संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मे.नानक कंस्ट्रक्शन भागीदारी संस्था यांनी त्यांच्याविरूध्द जिल्हा परिषद, नागपूर कार्यालयाने काळया यादीत टाकण्याबाबत पाठविलेला प्रस्ताव रद्द करणेबाबत मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल केलेल्या याचिका क्र.WP११८५/२०२३ बाबत मा.उच्च न्यायालयाने दि.२२.०२.२०२३ रोजी पुढील आदेश दिले आहेत.

"If any adverse order is passed pursuant to the hearing dated १७-२-२०२३, the same shall not be given effect till further order"

सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४ ) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मारेगांव (जि. यवतमाळ) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना १५ वित्त आयोगाअंतर्गत वस्तू खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ६२१८३ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत अनावश्यक वस्तू चढया दराने खरेदी करण्याकरिता पंचायत समितीचे अधिकारी यांनी दबाव आणून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ यांचेकडे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार प्राप्त होऊनही अद्यापही चौकशी अहवाल सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) मारेगांव तालुका येथील पंचायत समिती अंतर्गत सर्व ५१ ग्रामपंचायतींची ग्रामपंचायतीनिहाय चौकशी सुरू असून चौकशी पुर्ण झाल्यानंतर अहवाल सादर करण्यात येईल.

(३) गटविकास अधिकारी, पंचायत समिती यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करुन पंचायत समिती मारेगाव येथील सर्व ग्रामपंचायतीची १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत निधीमधून अनावश्यक वस्तु खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे. सर्व ग्रामपंचायतीची अंतिम चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक ) येथील आधारतीर्थ आधारश्रमातील चार वर्षीय बालकाचा झालेला मृत्यू

**(१७) * ५९८४५ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक ) येथील आधारतीर्थ आधारश्रमातील चार वर्षीय बालकाचा दोरीने गळा आवळून खुन झाला असल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमास महिला व बाल विकास विभागाची परवानगी नसतांनाही सदर आश्रम चालविला जात होता, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणात दोषी असण्या-या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर घटनेची चौकशी करण्यासाठी दिनांक २३ नोव्हेबर २०२२ व दि.२८ नोव्हेंबर, २०२२ रोजी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नाशिक व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देवून संस्थेमध्ये हजर असलेल्या ६९ मुले व ३३ मुली अशा एकुण १०२ बालकांसोबत वैयक्तिक संवाद साधला आहे.

(४) सदर संस्थेच्या बालकाश्रमाची मान्यता दि.२२.११.२०१३ रोजी रद्द करण्यात आली. तदनंतर सदर संस्था अनधिकृतपणे सुरु होती. त्याबाबत पोलीस विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे. सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व जिल्हाधिकारी यांना संस्था तपासणी करण्याबाबत कळविले आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये महिला शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत

**(१८) * ५८८१९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षेकरिता व त्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने प्रत्येक शाळेत किमान एका महिला शिक्षिकांची नेमणूक करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, अकोला शिक्षण समितीच्या सभेमध्ये जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेमध्ये किमान एक महिला शिक्षिकेची नेमणूक करावी अशा आशयाचा ठराव दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी तसेच जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी पारित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्हा परिषदेच्या अंतर्गत एकूण ९१३ शाळा असून त्या पैकी ३०१ शाळांमध्ये महिला शिक्षिकांची नेमणूक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये महिला शिक्षिकांची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, ही बाब खरी आहे.

(४) याबाबत सद्य:स्थितीत कोणतेही धोरण अस्तित्वात नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ येथील ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरमधील समस्या सोडविणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * ६२८०२ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) भुसावळ येथे साडेसहा कोटी रुपये खर्च करुन बांधलेल्या ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरमध्ये एकही सफाई कर्मचारी नसल्याने दोन्ही इमारतींमध्ये अस्वच्छता पसरली असल्याने या रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच कर्मचा-यांचे आरोग्यही धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात कर्मचाऱ्यांअभावी रुग्णसेवेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या रुग्णालयातील समस्या सोडविणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे अंशत खरे आहे.

कंत्राटी (कुशल व अकुशल सेवा) मनुष्यबळ पुरविण्याचे कंत्राटाचा कालावधी माहे डिसेंबर, २०२२ या कालावधीत संपुष्टात आल्याने सेवा बंद करण्यात आलेली आहे. तथापि सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या गट-ड च्या कर्मचाऱ्यांकडून साफसफाईची कामे करुन घेतली जात आहेत. तसेच स्वच्छता सेवेची निविदा राबविण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावरुन सुरु आहे.

(२) नाही.

(३) राज्यातील एकत्रित वैद्यकीय अधिकारी गट अ (एस -२०) ची पदे भरणा करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तसेच गट क व गट ड कर्मचाऱ्यांची २१ मंजूर पदे असून त्यातील ५ पदे भरलेली आहेत व १६ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देगलूर (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे महिलेचा झालेला मृत्यू

**(२०) * ६३१७८ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसुती व कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान श्रीमती मनीषा शिंदे या महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे दिनांक २० डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित दोषी डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन त्यांना सेवेतून कायमचे बडतर्फ करुन कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, मृत महिलेचे कुटुंबीय तसेच स्थानिक नागरिकांनी उपजिल्हाधिकारी कार्यालय, देगलूर येथे दिनांक ३० डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करुन या समितीच्या अहवालातील मजकुराचा बोध होत नसल्याने सदरील स्वयंस्पष्ट अहवाल देगलूर पोलिसांनी संबंधित विभागाकडे परत पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथील समितीने याबाबत दि २०.०२.२०२३ नुसार स्वयंस्पष्ट अहवाल सादर केला आहे.

(४) चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित स्त्रीरोगतज्ज्ञ यांच्या विरुद्ध कारवाई प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग ( जि.रायगड ) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील आंतररुग्ण इमारतीची दूरुस्ती करण्याबाबत

**(२१)** * **६२६६७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील आंतररुग्ण इमारत जीर्ण झाली असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या शेजारील एका मैदानात रोलरद्वारे सपाटीकरण करण्याचे काम सुरु असतांना रुग्णालयाच्या इमारतीला हादरे बसत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त इमारत धोकादायक झाली असल्याने तीचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चर ऑडिट) करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर इमारतीचे दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहे आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) होय.

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे, रायगड (BATU) या संस्थेमार्फत दिनांक ०८.१०.२०२० रोजी स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आलेले आहे तसेच विभाग प्रमुख, सिव्हील इंजिनिअर विभाग, विरमाता जीजाबाई टेक्नॉलॉजी इंस्टीट्यूट (VJTI), माटुंगा, मुंबई यांचेकडून दिनांक ०४.०२.२०२३ रोजी जिल्हा

रुग्णालय, रायगड-अलिबाग येथील आंतररुग्ण इमारतीचे यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट (संरचनात्मक परिक्षण) केलेल आहे.
(४) विभाग प्रमुख, सिव्हील इंजिनिअर विभाग, विरमाता जीजाबाई टेक्नॉलॉजी इंस्टिट्यूट (VJTI), माटुंगा मुंबई यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडिट (संरचनात्मक परिक्षण) अहवाल अप्राप्त आहे. स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल प्राप्त होताच त्याबाबत अनुषंगीक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टंचाईग्रस्त गावपाडयांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२२) * ५८७०१ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यासाठी जिल्हा परिषदेने पाणी टंचाई निवारणासंदर्भात रुपये १० कोटीच्या कृती आराखडयाला मंजुरी देऊन त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू टंचाईग्रस्त गावपाडयांना किमान ३० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच तेथील नारळवाडी, पारधवाडी, चिंतामणवाडी, जरंडी, गोलभण, भुईपाडा यासह टंचाईग्रस्त गावपाडयांकरीता २ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास तहसिल कार्यालय, शहापूर यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येऊनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे, शहापूर तालुक्यासाठी रु.५०.१८ कोटी इतक्या रुपयांच्या पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.
सदरहू टंचाईग्रस्त गावपाडयांना ६२ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजित आहे.
(३) सदर गावपाडयांकरीता दिनांक ०७.०२.२०२३ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांनी ०२ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत मंजूरी दिलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हा परिषद जलजीवन मिशन प्रकल्पामध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(२३) * ६१८८१ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांनी जलजीवन मिशनच्या कामांच्या निविदा न काढता सदर प्रक्रिया निविदा कंत्राटी कॅम्प्युटर ऑपरेटरद्वारे पार पाडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हा परिषदेच्या लेखाधिकाऱ्याने जिल्हाधिकाऱ्याकडे जिल्हा परिषद कार्यकारी अभियंत्याच्या आर्थिक गैरव्यवहाराची तक्रार दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलजीवन मिशनच्या संचिका आर्थिक व प्रशासकीय बाबतीत लेखाधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सदरील माहिती पाठवल्या जात नाही तसेच कार्यकारी अभियंता प्रत्येक कामामागे कंत्राटदाराकडून अंदाजित पत्रकाच्या मागे चार टक्के कमिशन मागत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलजीवन मिशनचे आर्थिक प्रकल्प संचालक ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी प्रचंड अनिमियता केल्याची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांना दिली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हापरिषदेतील विविध विभागातील भ्रष्टाचार उघड होत असूनही याप्रकरणी कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त प्रकरणातील संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) सदर प्रकरणी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांनी चौकशी करून जिल्हा परिषद, नांदेड कार्यालयास सविस्तर अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर प्रकरणात तथ्य आढळून येत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे.जे. रुग्णालायत नियमबाह्यरित्या यंत्र सामुग्री खरेदी केल्याबाबत

**(२४)** * **६१४७८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयात शासनाची परवानगी न घेता रुग्णालय प्रशासनाने महात्मा जोतीबा फुले योजनेच्या निधीमधून नियमबाह्यरित्या शिर्षक ५२ हेडनुसार सन २०१८-१९ या वर्षात १ कोटी ४१ लाख रुपयाची यंत्रसामुग्री खरेदी केल्या प्रकरणी तत्कालीन अधिष्ठाता डॉ.चंदनवाले यांनी डॉ.भोसले यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या चौकशी समितीने शासनास अहवाल सादर करुनही अद्याप सदर प्रकरणात संबंधित दोषीविरुद्ध कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा जोतीबा फुले योजनेअंतर्गत मिळण्या-या निधीमधून रुग्णालयासाठी यंत्र सामुग्री खरेदी करण्याची कोणतीही तरतुद नसतानाही रुग्णालय प्रशासनाने कोणत्या कायदा व नियमाच्या आधारे १ कोटी ४१ लाख रुपये किमंतीची यंत्रसामुग्री खरेदी केली,

(३) असल्यास, या प्रकरणा बाबत नेमलेल्या चौकशी समितीने शासनास सादर झालेल्या अहवालानुसार तत्कालीन प्रभारी अधिकारी व तत्कालीन संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय, दिनांक २१.०९.२०१८ नुसार संबंधित उद्दिष्टाखाली पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास अत्यंत तातडीच्या परिस्थितीत संस्थेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री विहित कार्यपद्धती- नुसार व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आर्थिक मर्यादेत खरेदी करण्याची तरतूद आहे.
(३) सदर प्रकरणी यापूर्वी नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल त्रोटक असल्याने संचालनालय स्तरावर दिनांक १८.०२.२०२३ नुसार त्रिस्तरीय समितीमार्फत नव्याने चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत कार्यरत अंगणवाडयांना पोषण आहाराचा पूरवठा विलंबाने होत असल्याबाबत**

**(२५) *६२५५० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातीत एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत कार्यरत असलेल्या दोन हजारांवर अंगणवाडयांना मागील दोन महिन्यांपासून पोषण आहाराचा पुरवठा विलंबाने होत असल्यामुळे मुलांना शिजविलेला आहाराच मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अंगणवाडयांमध्ये काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचा आहार वितरीत करण्यात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर जिल्हयातील अंगणवाडयांमध्ये विहित वेळेत दर्जेदार पोषण आहार पुरविण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत २१६१ नियमित अंगणवाड्या आणि २६२ मिनी अंगणवाडया कार्यरत असून कार्यरत अंगणवाडीतील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येतो. नागपूर जिल्ह्यामधील ग्रामीण भागातील स्थानिक बचत गटांनी आहार पुरवठ्याचे काम सोडून दिल्यामुळे महाराष्ट्र कन्झ्युमर फेडरेशन या संस्थेमार्फत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येतो आणि अंगणवाडी सेविकेमार्फत आहार शिजूवन बालकांना वितरीत केला जातो. लाभार्थ्यांना नियमित आहार पुरवठा करण्यात आला आहे व पोषण आहार पुरवठयामध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडला नाही.
(२) व (३) नागपूर जिल्ह्यातील उमरेड, सावनेर, भिवापूर आणि नागपूर (ग्रामीण) या प्रकल्पामध्ये गव्हाची सुजी व मिरची पावडर यांचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा झाल्याबाबत प्राप्त माहितीनुसार जिल्हा कार्यक्रम अधिकारी, नागपूर यांनी महाराष्ट्र कन्झ्युमर फेडरेशन या संस्थेस सदर माल बदलून देण्याबाबत कळविले होते. त्यानुसार महाराष्ट्र

कन्झ्युमर फेडरेशन यांनी सदर माल बदलून उत्कृष्ट प्रतीच्या मालाचा पुरवठा केला आहे. तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून सदर प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांमधुन मुगडाळ, चणा डाळ, साखर, मिरची पावडर, हळद पावडर, इ. प्रकारच्या कच्चे धान्य व किराणा मालाचे रॅन्डमली सॅम्पल घेऊन प्रादेशिक सार्वजनिक प्रयोगशाळा, नागपूर या शासकिय प्रयोगशाळेमध्ये तपासणी करीता पाठविण्यात आले होते. सदर मालाचा प्रयोगशाळा तपासणी अहवाल प्राप्त झाला असून, सदर तपासणी अहवालानुसार सदर माल खाण्यास योग्य असल्याचे नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड क्रांतीभूमीत आणि किल्ले रायगड या ऐतिहासिक स्थळांवर**
**सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(२६) * ६२६७० श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड क्रांतीभूमीत आणि किल्ले रायगड या ऐतिहासिक स्थळांवर सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ऐतिहासिक स्थळे पाहण्याकरिता महाराष्ट्रासह शेजारील कर्नाटक, केरळ या राज्यातून शैक्षणिक सहली मोठया प्रमाणात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी शैक्षणिक सहलींसाठी येणाऱ्या विद्यार्थांना राहण्याची, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच चवदार तळयाचा इतिहास सांगणारी व्यवस्था नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त ऐतिहासिक स्थळांवर सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.
(२) होय.
(३) व) ४) महाड चवदार तळे या क्रांतीभूमी स्थळी महाड नगर परिषदेने राहण्याची व्यवस्था, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली आहे .अतिरिक्त व्यवस्था व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाड नगर परिषदेमार्फत रु.५२.०० कोटी रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे .तसेच महाड क्रांतीभूमीचा बुध्दीष्ट सर्किटमध्ये समावेश करण्यात आला आहे.

रायगड किल्ला हा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ सर्कल अंतर्गत केंद्रीय संरक्षित स्मारक आहे . पर्यटकांसाठी प्रसाधनगृह, माहिती व मार्गीका दर्शविणारे फलक, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था रायगड किल्ल्यावर करण्यात आली आहे .त्याशिवाय रायगड विकास प्राधिकरणाकडून उपाहारगृह विकसित केले जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेले अनेक डॉक्टर खाजगी प्रॅक्टीस करीत असल्याबाबत

**(२७) * ६२५५१ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या अनेक डॉक्टरांची खाजगी रुग्णालये असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय सेवेत असूनही खाजगी प्रॅक्टीस करणा-या डॉक्टरांची चौकशी केली जाणार असल्याने कांही डॉक्टरांनी यापूर्वीच न्यायालयात जाऊन यास स्थगिती मिळविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय सेवेतील डॉक्टरांच्या खाजगी प्रॅक्टीसमुळे शासकीय रुग्णालयात येणा-या गरीब रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळत नसल्याने काही प्रसंगी त्यांना जीव गमावावा लागतो , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय,

(३) हे खरे नाही,

(४) व (५) सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.